**पाहिजेत**

ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत

नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.

संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com

महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त

स्थापना- 1986

**पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट सातारा**

Email : patilinstitutesatara@gmail.com

महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश

सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - 10 वी, 12 वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी

* इलेक्ट्रिकल सुपरवायझर
* इलेक्ट्रिकल वायरमन
* टू-व्हीलर मेकॅनिक
* A.C. मेकॅनिक
* कॉम्प्युटर ऑपरेटर
* ऑटोमोबाईल टेक्निशियन
* मोटार वायडिंग
* फोर व्हीलर मेकॅनिक
* वेल्डर / प्लंबर
* कॉम्प्युटर हार्डवेअर


एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय

प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.

प्रवेशासाठी संपर्क : 9822097071 / 7709509500

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ४४ वा | मंगळवार, दि. ०१ सप्टेंबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR











## अमृत महोत्सवी अभिष्टचिंतन सोहळ्यास हार्दिक शुभेच्छा !

माढा विधानसभा मतदारसंघाचे विकासरत्न, भाग्यविधाते, कर्मयोगी

# मा. आ. बबनराव विठ्ठलराव शिंदे

## अमृत महोत्सवी अभिष्टचिंतन सोहळा



**मा. ना. श्री. जयकुमार गोरे**
ग्रामविकास व पंचायतराज मंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई तथा पालकमंत्री सोलापूर



**मा. खा. श्री. रणजितसिंह नाईक-निंबाळकर**
माजी खासदार, माढा लोकसभा




**मा. आ. संजयमामा शिंदे**



**मा. रमेश मालक शिंदे**



**मा. श्री. रणजितसिंह शिंदे**
स्वागताध्यक्ष तथा चेअरमन, सोलापूर जिल्हा दूध संघ



**मा. श्री. विक्रमसिंह शिंदे**
संयोजक तथा मा. सभापती, पंचायत समिती कुर्डुवाडी

### -: शुभहस्ते :-

**मा. ना. श्री. जयकुमार गोरे**
ग्रामविकास व पंचायतराज मंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई तथा पालकमंत्री सोलापूर

### -: अध्यक्ष:-

**मा. खा. श्री. रणजितसिंह नाईक-निंबाळकर**
माजी खासदार, माढा लोकसभा

**मंगळवार दि. 01 सप्टेंबर, 2026 रोजी दुपारी 3.00 वा.**

**स्थळ :- विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना लि.**

**गंगामाईनगर, पो. पिंपळनेर, ता. माढा, जि. सोलापूर**

### -: निमंत्रक :-

**मा. श्री. विक्रमसिंह शिंदे**
संयोजक तथा मा. सभापती, पंचायत समिती कुर्डुवाडी

**मा. श्री. रणजितसिंह शिंदे**
स्वागताध्यक्ष तथा चेअरमन, सोलापूर जिल्हा दूध संघ

**मा. श्री. तुकाराम (बंडूनाना) ढवळे**
सचिव

**मा. श्री. शिवाजीराव कांबळे**
कार्याध्यक्ष

**मा. श्री. संजय पाटील भिमानगरकर**
अध्यक्ष

**सर्व समस्त पदाधिकारी, सदस्य व कार्यकर्ते वृंद**

**मा.आ.श्री.बबनराव (दादा) शिंदे वाढदिवस गौरव समिती**

**माढा तालुका व माढा विधानसभा मतदारसंघ**

## सौजन्यः पद्मजा एजन्सीज, कुर्डूवाडी

## संपादकीय

# ही कसली 'समृद्धी'?

महामार्ग जोडणारे असावेत; तोडणारे नसावेत. लुटणारे तर नसावेच नसावे. ज्या समृद्धी महामार्गाचे स्वप्न महाराष्ट्राने मोठ्या अपेक्षेने बघितले त्याच्या पूर्तीने मुंबई-नागपूर प्रवासाचे तास घटविले. वेगाला नवे परिमाण दिले. त्या रस्त्यावर छोट्यामोठ्या गाड्या सुसाट वेगाने धावतात. त्याचे कौतुक आहेच; पण आजकाल त्यावर त्यापेक्षाही अधिक वेगाने दरोडेखोरांच्या गाड्या धावत आहेत. सामान्य जनतेला लुटत आहेत. त्यांच्या मनात दहशत निर्माण करीत आहेत आणि आपली सुरक्षा यंत्रणा मात्र तोकडी ठरत आहे, याची घोर चिंता आहे.

मध्यरात्रीच्या अंधारात आणि दिवसाच्या उजेडात समृद्धीवर पडत असलेले दरोडे विकसित महाराष्ट्राच्या समृद्ध परंपरेला शोभणारे निश्चितच नव्हेत. हा महामार्ग साधा मार्ग नव्हे. त्या मार्गाहून विदर्भ, मराठवाडा, खान्देशातील शेतकरी आपल्या विकासाची गाडी वेगाने मुंबईच्या दिशेने घेऊन जातील आणि उन्नतीचा मार्ग गाठतील ही त्यामागील मूळ भावना. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला गती देणे हाच त्याचा खरा उद्देश. मात्र प्रारंभीच्या काळात घडलेल्या अपघातांच्या भयंकर मालिकांनी या महामार्गाला कुप्रसिद्धीच्या वाटेवर नेले. अपघात रोखण्यासाठी प्रयत्न ही झाले. त्याचवेळी आणखी एक काळी सावली तिथे पडू लागली. ती म्हणजे दहशतीची, दरोड्यांची.

गुरुवारी मध्यरात्री सिन्नर तालुक्यातील मलढोण व दुशिंगपूर शिवारातून जाणाऱ्या समृद्धी महामार्गावर दरोडेखोरांनी लोखंडी धारदार वस्तू फेकत दीड तास हैदोस घातला. छत्रपती संभाजीनगरच्या एका वकिलाची गाडी पंक्चर करीत, त्यांना मारहाण करीत लाखोंचा ऐवज लुटला. आणखी दोन गाड्यांना असेच लक्ष्य केले. ही झाली रात्रीची घटना. गुरुवारीच उत्तराखंडहून दर्शन घेऊन परतणाऱ्या राहुरीच्या व्यापाऱ्याला तर त्यांनी भरदिवसा सिनेस्टाइल लुटले. त्याच्या फॉर्च्युनर गाडीचा तीन गाड्यांतून पाठलाग केला. त्याला घेरले. उतरायला भाग पाडले. शिवीगाळ केली. गळ्यातील अडीच तोळ्याची सोन्याची साखळी लुटली.

आपण गाडीच्या डॅश कॅमेऱ्यात चित्रित होत आहोत हे लक्षात येताच ते दहा-बारा जण पळून गेले. नांदेडच्या व्यापाऱ्यालाही काही दरोडेखोरांनी अडविले होते. त्याने बंदुकीचा बार काढताच हे पळून गेले. या सगळ्या घटना काही तासांत पाठोपाठ घडल्या म्हणून चर्चेत आल्या. यापूर्वी याच महामार्गावर कोट्यवधीच्या लुटी झाल्या आहेत. खामगावहून सोने घेऊन निघालेल्या मुंबईच्या सराफा व्यापाऱ्याचे साडेचार किलो सोने मेहकर टोलनाक्याच्या रस्त्याहून पळविले. दुसरबीडच्या टोलनाक्यावरून बारा लाखांसह स्कॉर्पिओ गाडी पळविली होती. गाडी बंद पडली म्हणून कोपरगावजवळ थांबलेला परिवार असाच लुटला गेला.

घृष्णेश्वराचे दर्शन घेऊन उल्हासनगरकडे जाणाऱ्या भाविकांना सिन्नर येथे मारहाण केली. लुटले. करमाडचे डॉक्टर दाम्पत्यही त्याच धक्कादायक अनुभवातून गेले. अशा किती घटना सांगाव्यात! केवळ पैसे किंवा दागिने हेच यांचे लक्ष्य नाही. ते इतके सराईत आहेत की, जे हाती लागेल ते लुटतात. भिवंडीहून कोलकात्याकडे जाणाऱ्या चालत्या ट्रकमधून त्यांनी अडीच कोटी रुपये किमतीच्या लशी पळविल्या. डिझेल घेऊन येणारे दोन ट्रक इंजिन थंड व्हावे म्हणून रस्त्याच्या कडेला थांबले होते. चालकांचा डोळा लागला. बघता बघता त्यांच्या ट्रकमधून पाचशे लिटर डिझेल पळविले. जालन्यात तर टाकी फोडून डिझेल पळविले.

खरे तर 'समृद्धी' हा प्रवेश नियंत्रित द्रुतगती महामार्ग. टोलनाके, सीसीटीव्ही, महामार्ग पोलिसांचे जाळे; तरी दरोडेखोर महामार्गावर येतात कुठून? लूट करून त्यांची वाहने कोणत्या मार्गाने पसार होतात? महामार्गालगत चोरवाटा किंवा अनधिकृत प्रवेशमार्ग आहेत का? स्थानिक गुन्हेगारांना महामार्गावरील प्रवाशांची आणि मोठ्या आर्थिक व्यवहारांची माहिती मिळते कशी? या प्रश्नांचा छडा लावणे महत्त्वाचे आहे. आता दरोड्यांचे 'ब्लॅक स्पॉट' शोधण्याची वेळ आली आहे.

आपत्कालीन यंत्रणा सक्षम व्हावी. संशयास्पद वाहनांवर तातडीने लक्ष ठेवणारी यंत्रणा उभी राहावी. दरोडेखोरांचे आंतरजिल्हा व आंतरराज्यीय नेटवर्क उखडून काढले जावे. अन्यथा आधी ज्या मार्गावर अपघाताने माणसे मरत होती, आता त्या मार्गावर प्रवाशांच्या मनातील निर्भयता मरेल. महाराष्ट्र म्हणजे सुखरूप प्रवास ही ओळख संपेल. विकासाचा मार्ग, दरोडेखोरांच्या दहशतीचा मार्ग बनणे, महाराष्ट्राच्या प्रतिष्ठेसाठी शोभेचे नाही. 'समृद्धी'साठी तर नाहीच नाही!

# माढ्याच्या कृषी-औद्योगिक क्रांतीचे शिल्पकार : बबनदादा शिंदे

माढ्याच्या मातीत कष्ट करणाऱ्या शेतकऱ्याला, उन्हातान्हात राबणाऱ्या शेतमजुराला आणि गावाकडच्या सामान्य माणसाला जर आजच्या माढ्याकडे पाहून विचारले, 'काय बदललं?' तर त्याचं उत्तर एका वाक्यात मिळणार नाही. कारण हा बदल एखाद्या दिवसात झालेला नाही. त्यामागे अनेक वर्षांचा संघर्ष आहे, पाण्यासाठी केलेली धडपड आहे, शेतकऱ्याच्या दुःखाची जाणीव आहे आणि आपल्या माणसासाठी काहीतरी करून दाखवण्याची जिद्द आहे. या परिवर्तनाच्या वाटचालीत मा. आ. बबनदादा शिंदे यांचे नाव माढ्याच्या जनतेच्या मनात आदराने घेतले जाते. गावच्या सरपंचपदापासून सुरू झालेला त्यांचा प्रवास पंचायत समिती, जिल्हा दूध संघ, विधानसभा आणि सहकाराच्या क्षेत्रातून पुढे जात माढ्याच्या विकासाच्या एका मोठ्या पर्वात परिवर्तित झाला. दादांचे नेतृत्व हे केवळ राजकीय पदांपुरते मर्यादित राहिले नाही. ते गावकऱ्यांच्या सुख-दुःखात उभे राहिलेले, शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन त्याची अडचण समजून घेणारे आणि तालुक्याच्या भविष्यासाठी दूरचा विचार करणारे नेतृत्व म्हणून उभे राहिले. दादांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या कार्याचे चिंतनपार लेखाजोखा मांडण्याचा प्रयत्न.

### दुग्धक्रांतीचा पाया

माढा तालुका आणि संपूर्ण सोलापूर जिल्हा म्हणजे दुष्काळाशी कायमची झुंज देणारा प्रदेश. पाऊस पडेल की नाही, याची शाश्वती नाही. शेतीतून वर्षातून एकदा उत्पन्न मिळेल; तेही निसर्गाच्या लहरीवर. अशा परिस्थितीत शेतकऱ्याच्या हातात दररोजचा पैसा यावा, यासाठी दुग्धव्यवसाय हा मोठा आधार ठरू शकतो, हे दादांनी ओळखले. सन १९९० मध्ये सोलापूर जिल्हा दूध उत्पादक संघाच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर त्यांनी दूध व्यवसायाला ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मजबूत आधार देण्याचा प्रयत्न केला. दादांनी गावागावातील शेतकरी, शेतमजूर आणि बेरोजगार तरुणांना दुग्धव्यवसायाकडे वळवले. गाई खरेदीसाठी कर्ज, मार्गदर्शन आणि आवश्यक सहकार्य उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. कारण त्यांना माहिती होते— शेतीचे उत्पन्न वर्षातून एकदा मिळते; पण दूधाचे उत्पन्न रोज मिळते. दुधाच्या एका घागरीतून ग्रामीण कुटुंबाच्या संसाराला आधार मिळू शकतो, मुलाच्या शिक्षणाची फी भरता येऊ शकते, घरातील औषधोपचार होऊ शकतो. म्हणूनच दादांनी घातलेला दुग्धव्यवसायाचा पाया हा केवळ दूध संघाच्या प्रगतीचा विषय नव्हता; तो हजारो ग्रामीण कुटुंबांच्या आर्थिक स्वावलंबनाचा पाया होता.



### माढ्याच्या पाण्याचा संघर्ष अन समृद्धीची पहाट

माढ्याच्या मातीत कष्ट करणाऱ्या शेतकऱ्याला आजचा हिरवागार माढा पाहताना काही दशकांपूर्वीचा दुष्काळी माढा आठवतो, तेव्हा हा बदल एखाद्या स्वप्नासारखा वाटतो. पाण्यासाठी आसुसलेली शेती, पावसाच्या भरवशावर चालणारे संसार आणि रोजगारासाठी गाव सोडणारी तरुणाई—या परिस्थितीतून माढ्याला बाहेर काढण्याच्या संघर्षात बबनदादांचे नेतृत्व निर्णायक ठरले. उजनीचे पाणी माढ्याच्या मातीत आणण्याचा त्यांचा ध्यास केवळ सिंचन प्रकल्प नव्हता; तो हजारो शेतकरी कुटुंबांच्या भाग्योदयाचा आरंभ होता.

माढ्याचा इतिहास सांगताना सर्वांत मोठा प्रश्न कोणता होता, असे विचारले तर उत्तर एकच – पाणी! १९९५ मध्ये बबनदादा पहिल्यांदा आमदार झाले. त्यावेळी त्यांच्या समोर सत्तेचे अनेक पर्याय होते. मंत्रिपदाची संधीही चालून आली. पण दादांनी स्वतःसाठी पद मागण्याऐवजी माढ्याच्या शेतकऱ्यासाठी पाणी मागितले. मुंबईतील ह्यमातोश्रीह्णवर झालेल्या भेटीत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांच्यासमोर मंत्रिपदाचा प्रस्ताव ठेवला. मात्र दादांनी स्पष्ट सांगितले—'मला मंत्रीपद नको; माझ्या दुष्काळी माढा तालुक्याचा दुष्काळ हटवा. उजनीचे पाणी माढ्याला मिळाले पाहिजे.'

आजच्या राजकारणात हा प्रसंग पुन्हा पुन्हा आठवावा असा आहे. कारण पद सोडून प्रकल्प मागणारा नेता ही गोष्ट सहज घडत नाही. भीमा-सीना जोडकालवा आणि सीना-माढा उपसा जलसिंचन योजनेसाठी दादांनी अथक पाठपुरावा केला. जमिनीखालून सुमारे १९ किलोमीटरचा बोगदा उभारून भीमेचे पाणी सीनेच्या खोऱ्यात आणण्याचा हा प्रयत्न होता. एकेकाळी अशक्य वाटणारी गोष्ट प्रत्यक्षात आली. दादांनी संघर्ष करून उजनीचे पाणी माढ्याच्या मातीत आणले. पाणी माढ्यात आले आणि केवळ शेती हिरवी झाली नाही; तर माढ्याच्या माणसाचे भविष्य हिरवे झाले.

### कृषी औद्योगिक विकासाची दूरदृष्टी

दादांना एवढ्यावरच थांबायचे नव्हते. शेतात ऊस पिकला, पण त्याला योग्य बाजारपेठ आणि योग्य भाव मिळाला पाहिजे, हे त्यांनी ओळखले. यातूनच विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याची उभारणी झाली. कारखाना म्हणजे फक्त साखर तयार करणारी संस्था नव्हे; तर शेतकऱ्याच्या घामाला बाजारपेठ देणारे आर्थिक केंद्र आहे, या विचाराने त्याची वाटचाल झाली. साखर कारखान्यासोबत डिस्टिलरी, सहवीजनिर्मिती, रिफायनरी अशा प्रकल्पांची उभारणी झाली. म्हणजे शेतात तयार झालेल्या उसाचे पुढे मूल्यवर्धन झाले. त्यातून रोजगार निर्माण झाला. वाहतूक वाढली. कामगार, व्यापारी, छोटे व्यावसायिक, हॉटेलवाले, वाहनधारक—अनेकांच्या हाताला काम मिळाले. हीच खरी कृषी औद्योगिक क्रांती आहे. शेतकऱ्याच्या शेतातील पीक कारखान्यात जाते आणि त्यातून तयार होणाऱ्या उद्योगाच्या चाकाला संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था जोडली जाते. त्यामुळे दादांची विकासदृष्टी केवळ 'ऊस लावा' एवढी मर्यादित नव्हती; ती 'शेती करा, प्रक्रिया करा, मूल्यवर्धन करा आणि ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करा' अशी व्यापक होती. आज शेतीत ड्रोन व कृत्रिम बुद्धिमता अशा तंत्रज्ञानाच्या वापराबाबत देखील ते आग्रही आहेत.

### संकटातही आपल्या माणसासाठी उभे राहणारे नेतृत्व

दादांच्या राजकारणाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी विकासाला राजकारणाच्या केंद्रस्थानी ठेवले. गावातील रस्ता, पाणी, शेती, दूध, कारखाना, शिक्षण, आरोग्य, रोजगार—हे प्रश्न त्यांच्या राजकीय कामाचे विषय बनले. त्यामुळे त्यांचे राजकारण केवळ निवडणुकीपुरते मर्यादित राहिले नाही. गावातील सामान्य माणसाच्या आयुष्याशी जोडलेले राजकारण त्यांनी उभे केले. माढ्यातील अनेक गावांमध्ये आज जे बदल दिसतात, त्यामागे अनेक हात आहेत; अनेक पिढ्यांचे कष्ट आहेत. पण त्या कष्टांना दिशा देणारे नेतृत्वही तितकेच महत्त्वाचे असते.

नेता कोण, हे फक्त निवडणुकीत ठरत नाही. संकटाच्या काळात तो आपल्या माणसांसाठी किती उभा राहतो, यातून खरे नेतृत्व दिसते. अतिवृष्टी, महापूर आणि नैसर्गिक संकटांच्या काळात शेतकरी आणि सामान्य नागरिकांचे मोठे नुकसान होते. अशा प्रसंगी मदतकार्य उभे करण्यासाठी आणि संकटग्रस्तांना आधार देण्यासाठी दादांनी सातत्याने पुढाकार घेतला. आरोग्याच्या उपचारासाठी अमेरिकेत असतानाही पूरग्रस्तांसाठी सुरू असलेल्या मदत कार्यासाठी यंत्रणा कामाला लावून कुटुंब प्रमुखासारखी काळजी घेतली, हे त्यांच्या जनतेशी असलेल्या जिव्हाळ्याचे उदाहरण आहे. कारण माणूस पदावर असताना नेता असतो; पण संकटात माणसांसाठी धावून जातो तेव्हा तो लोकनेता होतो. या वाटचालीत मा. आ. बबनदादा शिंदे यांचे योगदान माढ्याच्या जनतेसाठी कायम स्मरणात राहील.

आज दादा ७५व्या वर्षात पदार्पण करीत असताना माढ्याच्या मातीतला प्रत्येक शेतकरी, प्रत्येक कष्टकरी आणि प्रत्येक सामान्य माणूस त्यांच्या कार्याकडे कृतज्ञतेने पाहतो. आदरणीय दादाना ७५व्या वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक कोटी कोटी शुभेच्छा!

**डॉ. नितीन उबाळे,**
प्राचार्य, आर्या कृषी महाविद्यालय, मानेगाव,
ता. माढा, जि. सोलापूर
मो. 9975678175

# पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्युट मध्ये शासकिय कॉम्प्युटर व तांत्रिक कोर्सेस ना 15 सप्टेंबर पर्यंत प्रवेश देणे सुरू

**सातारा (कटूसत्य वृत्त):-** पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट सातारा मध्ये महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास परीक्षा मंडळ, मुंबई बोर्डाच्या विविध कॉम्प्युटर व तांत्रिक अभ्यासक्रमांना प्रवेश देणे सुरू आहे. या मध्ये १) इलेक्ट्रिकल सुपरवायझर ऑन कन्स्ट्रक्शन साईट २) ऑटोमोबाईल मेकॅनिक टेक्निशियन टू व्हीलर, फोर व्हीलर मेकॅनिक ३) इलेक्ट्रिकल वायरमन ४) मोटर आर्मचर वाइंडिंग ५) कॉम्प्युटर ऑपरेटर विथ एम एस ऑफिस ६) कॉम्प्युटर पी सी मेंटेनेंस ७) एयर कंडीशन रेफ्रिजरेटर मेकॅनिक तसेच १) डिप्लोमा इन ऑटोमोबाईल सर्व्हिसेस २) डिप्लोमा इन इलेक्ट्रिकल सर्व्हिसेस इ. तांत्रिक व कॉम्प्युटर कोर्सेस ना प्रवेश देणे सुरू आहे. सदर कोर्सेस ना पात्रता ८ वी /१० वी/१२ वी पास/नापास आहे तसेच कॉलेज मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना, विविध कंपन्या, ऑफिसेस मधील कामगार/कर्मचारी यांना प्रवेश घेता येतो. सर्व कोर्सेस चे माध्यम मराठी/इंग्रजी आहे.

वरील विविध तांत्रिक कोर्सेस च्या शासकिय परीक्षा होतात. प्रशिक्षण पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना विविध कंपन्या मध्ये १००% नोकरी / जॉब दिले जातात. विविध योजने अंतर्गत व्यवसाय साठी लोन मिळते.

इलेक्ट्रिकल कोर्स पूर्ण झाल्यानंतर पी डबलू. डी वायरमन लायसन परीक्षेस बसता येते. एस एस रजिस्ट्रेशन साठी मार्गदर्शन केले जाते.

विद्यार्थ्यांना ये न्या जाण्या साठी एस टी पास ची सोय असून विविध जिल्ह्यामधील विद्यार्थांना प्रवेश दिला जातो. ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया बाबत समक्ष ऑफीस मध्ये भेटा.

तांत्रिक कोर्सेस चे प्रशिक्षण पूर्ण केलेले प्रशिक्षणार्थी अल्प भांडवला मध्ये स्वतः चा उद्योग व्यवसाय सुरू करतात

प्रशिक्षण पूर्ण केलेल्या अनेक विद्यार्थांनी स्वतःच्या जिद्द व प्रयत्न वर व्यवसाय सुरू करून स्वावलंबी झालेले आहेत व होत आहेत.

प्रवेश घेते वेळी विद्यार्थ्यांनी शाळेचा दाखला, १० वी/१२ वी पास चे सर्टिफिकेट, मार्कशीट, 8 फोटो, आधार कार्ड झेरॉक्स ई.कागदपत्रांची पूर्तता करून प्रवेश अर्ज ऑफिस मध्ये जमा करावेत.

माहितीपत्रक व प्रवेश फॉर्म ची किंमत रुपये १००/- असून मनीऑर्डर ने रुपये १२५ /- पाठवा.

तेव्हा विद्यार्थी, पालकांनी अधिक माहिती साठी संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ.सुनीलकुमार पाटील व प्राचार्य सुजित पाटील. पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट प्लॉट नंबर ११ राधिका रोड एस टी स्टँड जवळ सातारा मोबाईल 9822097071 / 7709509500, ऑफीस वेळ सकाळी 10 ते 5 या वेळेत संपर्क साधावा. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ दिनांक १ ऑगस्ट पासून सुरू झाले आहे. प्रवेशाची अंतिम दिनांक 15 सप्टेंबर पर्यंत आहे.

E-mail: patilinstitutesatara@gmail.com

# टेंभुर्णीच्या माजी सरपंच सौ. सुलन महाडीक - देशमुख यांचे निधन

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** टेंभुर्णी गावच्या माजी सरपंच सौ. सुलन रावसाहेब महाडीक-देशमुख यांचे रविवार, दि. ३० ऑगस्ट २०२६ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच टेंभुर्णी परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली. त्यांच्या जाण्याने महाडीक-देशमुख परिवारासह नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रपरिवार आणि परिचितांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. सौ. सुलन महाडीक-देशमुख यांनी टेंभुर्णी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाची जबाबदारी अत्यंत जिद्दीने आणि कर्तव्यनिष्ठेने सांभाळली होती. आपल्या कार्यकाळात गावाच्या विकासाच्या प्रश्नांना प्राधान्य देत त्यांनी सार्वजनिक जीवनात सक्रिय योगदान दिले. ग्रामस्थांच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहण्याबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी गावातील नागरिकांच्या सुख-दुःखात सहभाग घेतला.

### प्रेमळ स्वभावामुळे ग्रामस्थांमध्ये विशेष आदर

सौ. सुलन देशमुख यांचा साधेपणा, प्रेमळ स्वभाव आणि माणुसकीची भावना यामुळे ग्रामस्थांमध्ये त्यांच्याबद्दल विशेष आदर होता. लहान-मोठ्यांशी आपुलकीने वागणे, अडचणीच्या काळात मदतीला धावून जाणे आणि नागरिकांच्या सुख-दुःखात



सहभागी होणे, ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये होती.

सार्वजनिक जीवनात काम करत असताना त्यांनी पदापेक्षा माणुसकीला अधिक महत्त्व दिले. त्यामुळे ग्रामस्थांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले होते. त्यांच्या निधनाने टेंभुर्णी गावातील सामाजिक व सार्वजनिक जीवनात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

### गावच्या विकासासाठी योगदान

सरपंच म्हणून काम करताना सौ. सुलन महाडीक-देशमुख यांनी गावाच्या विकासाशी संबंधित विविध बाबींमध्ये लक्ष घातले. ग्रामपंचायतीची जबाबदारी सांभाळताना गावहिताला प्राधान्य देत त्यांनी आपल्या कार्यकाळात योगदान दिले. त्यांच्या कार्याची आणि सामाजिक बांधिलकीची आठवण ग्रामस्थांच्या कायम स्मरणात राहणार आहे.

### कुटुंबासाठी मायेची सावली हरपली

सौ. सुलन देशमुख यांच्या निधनाने महाडीक-देशमुख परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. कुटुंबासाठी मायेची सावली आणि आधार असलेली व्यक्ती अचानक काळाच्या पडद्याआड गेल्याने परिवारावर दुःखाचे सावट पसरले आहे. त्यांच्या प्रेमळ सहवासाच्या आठवणी, संस्कार आणि मायेची ऊब कुटुंबीयांच्या कायम स्मरणात राहणार आहे.

त्यांच्या पश्चात बाळासाहेब महाडीक-देशमुख, सुधीर महाडीक-देशमुख व महावीर महाडीक-देशमुख ही मुले, तसेच ग्रामपंचायत सदस्य वैभव भैया महाडीक-देशमुख यांच्यासह नातवंडे आणि मोठा आप्तेष्ट परिवार आहे.

### सार्वजनिक जीवनातील योगदान कायम स्मरणात

सौ. सुलन महाडीक-देशमुख यांनी टेंभुर्णीच्या सार्वजनिक जीवनात दिलेले योगदान आणि सामाजिक बांधिलकी जपताना निर्माण केलेली माणसांची नाती त्यांच्या पश्चातही स्मरणात राहतील. त्यांच्या निधनाने टेंभुर्णीकरांनी एक प्रेमळ, अनुभवी, कर्तव्यनिष्ठ आणि कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व गमावले आहे. त्यांच्या निधनाबद्दल टेंभुर्णी परिसरातील ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते, नातेवाईक, आप्तेष्ट आणि मित्रपरिवारातून शोक व्यक्त करण्यात येत असून, महाडीक-देशमुख परिवाराच्या दुःखात सर्वजण सहभागी झाले आहेत.

# सोलापूरच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी महापालिकेची नसून प्रत्येक नागरिकाची- सी. ए. जवळकर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरचा सर्वांगीण विकास ही केवळ शासन किंवा महानगरपालिकेचे जबाबदारी नसून शहरातील प्रत्येक नागरिक उद्योजक आणि सामाजिक संस्थेची सामूहिक जबाबदारी आहे असे प्रतिपादन चित्राज सिटी साईड रिसॉर्टचे मालक तथा उद्योजक धीरज जवळकर यांनी केले. ते पुढे बोलताना म्हणाले की सोलापूर शहराला ऐतिहासिक धार्मिक औद्योगिक आणि सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. या वैशिष्ट्यांचा योग्य उपयोग करून सोलापूरला राज्यतील एक प्रमुख पर्यटन आणि व्यावसायिक केंद्र म्हणून विकसित करता येऊ शकते. त्यासाठी प्रशासन, उद्योजक, व्यापारी, सामाजिक संस्था आणि सजग नागरिकांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

शहराचा विकास म्हणजे केवळ रस्ते, पूल आणि मोठ्या इमारती उभारणे नव्हे तर स्वच्छता, हरित परिसर, दर्जेदार शिक्षण, आरोग्य सुविधा, सुरक्षित वाहतूक, पर्यटन वृद्धी आणि रोजगार निर्मिती या सर्व बाबी विकासाशी निगडित आहेत. प्रत्येकाने शहराप्रती आपली जबाबदारी ओळखली तर सोलापूरच्या प्रगतीला निश्चितच नवी गती मिळेल. अशी मला आशा वाटते.

### पर्यटन आणि रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न

अ) सोलापूरच्या पर्यटन



क्षेत्राला चालना देण्याच्या उद्देशाने चित्राज सिटी साईड रिसॉर्ट कार्यरत आहे. शहराच्या परिसरात पर्यटकांना दर्जेदार निवास, मनोरंजन आणि कौटुंबिक पर्यटनाच्या सुविधा उपलब्ध करून देतानाच स्थानिक युवकासाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचे काम रिसॉर्टच्या माध्यमातून केले जात आहे.

ब) चित्राज सिटी साईड रिसॉर्ट मध्ये शंभर खोल्या, भव्य बँक्वेट हॉल, 40 हजार चौरस फुटांचे प्रशस्त लॉन, वॉटर पार्क, अडवेंचर पार्क, क्रिकेटर टर्फ, व्ही.आर.गेम्स शाकाहारी रेस्टॉरंट आणि मीटिंग रूम अशा विविध सुविधा उभारण्यात आल्या आहेत त्यामुळे सोलापूर आणि परिसरातील नागरिकांना विवाह सोहळे कौटुंबिक कार्यक्रम व्यावसायिक बैठका आणि पर्यटनासाठी एक सर्वसमावेशक ठिकाण उपलब्ध झाले असल्याची भावना सोलापुरात निर्माण झाली आहे.

क) सोलापूरच्या पर्यटन विकासात आपलाही वाटा असावा या भावनेतून चित्राज सिटी साईड रिसॉर्ट कार्य करीत आहे. बाहेरून येणाऱ्या पर्यटकांना चांगल्या सुविधा देणे, सोलापूरची सकारात्मक ओळख निर्माण करणे, आणि स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध करून देणे, हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. असे धीरज जवळकर यांनी सांगितले.

ड) सोलापूर परिसरात धार्मिक पर्यटना बरोबरच कौटुंबिक, कृषी, सांस्कृतिक आणि व्यावसायिक पर्यटनाला मोठी संधी आहे. शहरातील पर्यटन स्थळांचा प्रभावी प्रचार, परिसराचे सुशोभीकरण, स्वच्छतेचे नियोजन आणि पर्यटकांना उत्तम सुविधा उपलब्ध करून दिल्यास स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळू शकते. असेही त्यांनी आवर्जून नमूद केले.

इ) माझे शहर – माझी जबाबदारी ही भावना प्रत्येक सोलापूरकराने मनात रुजवली पाहिजे. प्रत्येक उद्योग आणि व्यावसायिक संस्थेने शहराच्या विकासासाठी आणि स्थानिक रोजगार निर्मितीसाठी योगदान दिल्यास सोलापूर लवकरच एक स्वच्छ, सुंदर, हरित आणि पर्यटनाच्या दृष्टीने आकर्षक शहर म्हणून नावारूपाला येईलच, असा ठाम विश्वासही जवळकर यांनी व्यक्त केला.

ई) चित्राज सिटी साईड रिसॉर्ट च्या माध्यमातून सोलापूरच्या आदरातिथ्य आणि पर्यटन क्षेत्राला आधुनिक स्वरूप देण्याचा प्रयत्न केला जात आहे. पर्यटक तसेच स्थानिक नागरिकांना एकाच ठिकाणी निवास भोजन, मनोरंजन, कौटुंबिक कार्यक्रम आणि व्यावसायिक बैठकांच्या दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. रिसॉर्ट मध्ये आयोजित होणाऱ्या विविध कार्यक्रमामुळे स्थानिक मंडप व्यावसायिक, डेकोरेटर्स, छायाचित्रकार, कलाकार, वाहतूकदार आणि इतर छोट्या उद्योजकांनाही व्यवसायाच्या नव्या संधी उपलब्ध होत आहेत.

उ) सोलापूरचा विकास साधायचा असेल तर स्थानिक नागरिकांनी स्थानिक उद्योजक व्यावसायिक आणि पर्यटन स्थळांना प्राधान्य दिले पाहिजे शहरात येणाऱ्या प्रत्येक पर्यटकाला चांगली सेवा आणि सोलापूरच्या पाहुणचाराचा आनंददायी अनुभव मिळाला पाहिजे तरच पर्यटक शहराचा सदिच्छा दूत बनेल असे मला विश्वासाने, अनुभवाने आणि विश्वासाने वाटते. चित्राज सिटी साईड रिसॉर्ट च्या माध्यमातून सोलापूरची सकारात्मक ओळख राज्यभर पोहोचविण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत असे धीरज जवळकर यांनी सांगितले. या सर्व सुविधा उपलब्ध होण्यासाठी सोलापूर शहर व परिसरातील नागरिकांनी 89 560 33 100, 89 560 33 101, 105, अष्टयात्तर 87 87 75 63 या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन जवळकर परिवारातर्फे करण्यात आले आहे.

## वात्रटिका

### पुन्हा निर्भया

लेकी बाळी सुरक्षित आहेत
हा आपला कयास आहे...
गाव आणि शहरात आजही
हैवानाची जिवंत पैदास आहे...
निर्भयाबरोबर घडले ते अजून
तुमच्या आमच्या ध्यानी आहे...
अजूनही घडते आहे कांड ती
आपली राजधानी आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# कोऱ्या ठरावांवरून मतदारयादी?

## दक्षिण सोलापुरात सहकार निवडणुकीच्या प्रक्रियेवर आ. सुभाष देशमुखांचा आक्षेप



**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :-** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दक्षिण सोलापूर तालुक्यात सहकारी संस्थांच्या ठरावांवरून राजकीय वातावरण तापले आहे. विविध सहकारी संस्थांच्या संचालकांना विश्वासात न घेता कोऱ्या ठरावांवर स्वाक्षऱ्या घेऊन मतदार प्रतिनिधींची यादी तयार केली जात असल्याचा गंभीर आरोप माजी मंत्री तथा आमदार सुभाष देशमुख यांनी केला आहे. याबाबत त्यांनी पुणे विभागीय सहनिबंधकांकडे तक्रार दाखल करून संबंधित ठरावांची काटेकोर पडताळणी करण्याची मागणी केली आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांकडून मतदान प्रतिनिधींचे ठराव घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. या ठरावांपैकी जास्तीत जास्त ठराव आपल्या बाजूने करून घेण्यासाठी सत्ताधारी भाजपच्या नेत्यांकडून प्रयत्न सुरू असल्याची चर्चा सहकार क्षेत्रात आहे. याच पार्श्वभूमीवर दक्षिण सोलापूर तालुक्यात कोरे ठराव करून घेण्याचा प्रकार सुरू असल्याचा आरोप आमदार देशमुख यांनी केला आहे.

पुणे विभागीय सहनिबंधकांकडे दिलेल्या तक्रारीत त्यांनी तालुक्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. काही संस्थांमध्ये अध्यक्ष व सचिव संगनमताने संचालकांना विश्वासात न घेता प्रोसिडिंग बुकवर त्यांच्या स्वाक्षऱ्या घेत असल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे.

तसेच संबंधित प्रोसिडिंग बुक तालुक्यातील एका माजी संचालकाच्या ताब्यात ठेवण्यात येत असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. संचालक मंडळाची बैठक, ठरावाचा विषय आणि मतदान प्रतिनिधीची निवड याबाबत संचालकांना माहिती न देता ठराव मंजूर केल्यास त्यांच्या अधिकारांवर गदा येण्याची शक्यता असल्याचे देशमुख यांनी म्हटले आहे.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी सादर होणाऱ्या सर्व ठरावांची पारदर्शक पद्धतीने पडताळणी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. त्यामुळे सहकार विभाग आता या तक्रारीवर काय भूमिका घेतो, याकडे दक्षिण सोलापूरसह संपूर्ण जिल्ह्यातील सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

**ठराव प्रक्रियेचे व्हिडीओ रेकॉर्डिंग करा**

सहकारी संस्थेचा ठराव घेताना तो संबंधित संस्थेच्या कार्यालयातच घेण्यात यावा. तसेच जीपीएस लोकेशनसह संपूर्ण प्रक्रियेचे व्हिडीओ रेकॉर्डिंग करून त्याची प्रत सादर करण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी आमदार सुभाष देशमुख यांनी केली आहे. प्रत्येक सहकारी संस्थेच्या ठराव प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी निबंधक कार्यालयाकडून स्वतंत्र अधिकारी नियुक्त करावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

# पंढरपूर तालुक्यात दोन बालविवाह रोखले




**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर तालुक्यात एकाच दिवशी होणारे दोन बालविवाह रोखण्यात पंढरपूर पोलिसांच्या निर्भया पथकाला यश आले. गोपनीय माहिती मिळताच पथकाने तातडीने कारवाई करत अवघ्या १५ वर्षे वयाच्या दोन अल्पवयीन मुलींचे विवाह थांबवले. त्यामुळे बालविवाहाला आळा घालण्यासाठी पोलिसांनी केलेल्या या कारवाईचे कौतुक होत आहे.

दि. ३० ऑगस्ट रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास पंढरपूर ग्रामीण पोलिस ठाणे व पंढरपूर तालुका पोलिस ठाण्याच्या हद्दीत दोन बालविवाह होणार असल्याची गोपनीय माहिती निर्भया पथकाला मिळाली. माहिती मिळताच पथकाने दोन्ही ठिकाणी धाव घेत संबंधित कुटुंबीयांकडे चौकशी केली.

चौकशीदरम्यान नातेवाईकांनी सादर केलेल्या आधारकार्डवरून एका मुलीचे वय १४ वर्षे ११ महिने, तर दुसऱ्या मुलीचे वय १५ वर्षे असल्याचे समोर आले. पोलिसांनी अधिक खातरजमा करण्यासाठी दोन्ही मुलींचे शाळा सोडल्याचे दाखलेही तपासले. त्यावरही त्यांचे अल्पवय असल्याचे स्पष्ट झाले.

यानंतर निर्भया पथकाने मंडपातील उपस्थित मंडळी तसेच संबंधित वडिलांना बालविवाहाच्या कायदेशीर परिणामांची माहिती देत समज दिली आणि दोन्ही विवाह तत्काळ थांबवले. त्यापैकी एका अल्पवयीन मुलीला पुढील कार्यवाहीसाठी सोलापूर येथील बालकल्याण समितीसमोर हजर करण्यात आले.

पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे पंढरपूर तालुक्यात बालविवाह लावणारे आणि करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेसाठी आणि त्यांचे शिक्षण व भवितव्य अबाधित ठेवण्यासाठी पोलिस प्रशासनाने घेतलेली ही भूमिका महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलिस अधीक्षक प्रेरणा कट्टे आणि सहायक पोलिस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली निर्भया पथकाच्या प्रमुख महिला पोलिस उपनिरीक्षक सुप्रिया यादव रावण, पोसई भोसले, पंढरपूर तालुका पोलिस ठाण्याचे पोकॉ शशिकांत सावंत, वाघे, सपोफौ अरुण राजकर, पोकॉ काळे व पोकॉ माळी यांनी केली.

# आमदार सचिन कल्याणशेट्टी; दुधनी बाजार समितीच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त) :-** कृषी उत्पन्न बाजार समिती ही ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची व्यवस्था असून, शेतकऱ्यांच्या कष्टाला त्यांच्या शेतीमालातून योग्य मोबदला मिळवून देण्यासाठी बाजार समितीने प्रभावीपणे काम करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.

अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतिपदी सिद्धाराम बाके, तर उपसभापतिपदी निंगप्पा पुजारी यांची निवड झाली. या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते सत्कार करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

आमदार कल्याणशेट्टी म्हणाले की, संचालक मंडळाने नवी जबाबदारी स्वीकारून शेतकरी बांधवांच्या हितासाठी भरीव काम करावे. शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य बाजारपेठ, योग्य भाव आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच बाजार समितीच्या माध्यमातून त्यांच्या विविध अडचणी सोडविण्यास प्राधान्य द्यावे. बाजार समितीच्या कारभारातून शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळेल, यासाठी संचालक मंडळाने प्रयत्नशील राहावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

यावेळी भाजपा सोलापूर जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, उपसभापती सागर कल्याणशेट्टी, जिल्हा परिषद सदस्य विकास बुळ्ळा, सिद्धाराम शिवमूर्ती, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सुनील कळके, यशवंत तात्या धोंगडे, महेश हिडोळे, प्रवीण शहा, शिवशरण जोजन, मंडल अध्यक्ष प्रदीप पाटील, सुनील खेड, महादेव पाटील, अमोल हिप्परगी, रमेश पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक, भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धोत्री प्रशालेचे पर्यवेक्षक देगांवकर यांचा सेवापूर्तीनिमित्त सत्कार



**धोत्री (कटूसत्य वृत्त):-** दक्षिण सोलापूर तालुक्यातील धोत्री येथील श्री भगवती गौरीमाता प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक सचिन देगांवकर यांचा सेवानिवृत्तीनिमित सत्कार करण्यात आला.

प्रारंभी श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी व तपोरत्न योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शाळेच्यावतीने मान्यवरांच्या हस्ते सचिन व सीमा देगांवकर यांचा पुर्ण अहेर,शाल, हार आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी वैष्णवी कागे या विद्यार्थिनीने सेवानिवृत्ती गीत सादर केले. सृष्टी वाघमारे, कलावती कुंभार,भानुदास राठोड, पंचय्या स्वामी, मुख्याध्यापक गिरमल बुगडे यांनी देगांवकर यांच्याविषयी गौरवोद्गार काढले. देगांवकर म्हणाले, संस्थेने, शाळेने, पालकांनी, सहकारी शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी भरभरून प्रेम दिल्यामुळे आज आनंदाने सेवानिवृत्त होत असल्याचे सांगितले.

यावेळी व्यासपीठावर बृहन्मठ होटगी संस्थेचे संचालक शशिकांत रामपुरे, शालेय समितीचे सदस्य शिवशरण बिराजदार,विठ्ठल रामपुरे , हणमंत चौगुले, राजकुमार पाटील, बसप्पा पाटील, भिमशा पाटील,राणी व्हटकर, सोमनाथ स्वामी, सैपन शेख, सिद्धय्या स्वामी, षडाक्षरी स्वामी, राम ढाले,धनंजय नकाते, अमोगसिद्ध बिराजदार, श्रीशैल व्हनमाने, महादेव व्हनमाने, मल्लेशा व्हनमाने, यल्लप्पा व्हनकडे,प्रकाश कारभारी आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच आकांक्षा पोशनगीर, अक्षय देगांवकर,विनायक चित्रावकर,दिपक गवसाने, आप्तेष्ट,सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजशेखर व्हनकडे यांनी केले तर मल्लिकार्जुन गुरव यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संजय पाटू,चंद्रकांत स्वामी, भीमाशंकर बिराजदार, शेखर पाटील,महेश हांडगे, बाबुराव फुलारी आदींनी परिश्रम घेतले.

## जाहीर प्रसिध्दीकरण

जन्म नोंदणी अर्ज क्र. ५४२/२०२६

**मोहोळ येथील मा. तहसिलदार साहेब यांचे न्यायालयात**

शामराव उमाजी देशमुख } **अर्जदार**

**विरूद्ध**

मुख्याधिकारी
मोहोळ नगरपरिषद मोहोळ } **सामनेवाला**

याअर्थी अर्जदाराची मुलगी दिपाली शामराव देशमुख हिचा जन्म दि. १३/०६/१९९९ रोजी झाला आहे. तिच्या जन्माची नोंद मोहोळ येथील नगरपरिषद कार्यालयामध्ये जन्म तारखेपासून एक महिन्याच्या आत करणे आवश्यक असल्याची माहिती व जाणिव अर्जदारास नव्हती. त्यामुळे सदरची नोंद करण्याचा आदेश मोहोळ नगरपरिषद मोहोळ यांना व्हावा अशी मागणी अर्जदाराने मे. कोर्टामध्ये सदरचा अर्ज दाखल करून केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस सदर प्रसिध्दीकरणाव्दारे कळविण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे अर्जदाराची मुलगी दिपाली शामराव देशमुख हिचा जन्म दि. १३/०६/१९९९ रोजी झाल्यामुळे तिच्या जन्माची नोंद मोहोळ नगरपरिषदेचे रेकॉर्ड मध्ये घेण्यास कोणाचीही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपली तक्रार/हरकत स्वतः अगर वकीलामार्फत या मे. कोर्टात सादर करावी. मुदतीत कोणाची हरकत न आल्यास कायदेशीर बाबींचा विचार करून मुख्य कार्यकारी अधिकारी नगर परिषद मोहोळ यांना अर्जदाराची मुलगी दिपाली शामराव देशमुख हिचा जन्म दि. १३/०६/१९९९ रोजी झाल्याची नोंद घेण्याचा आदेश करण्यात येईल, त्यानंतर कोणाचीही काहीही हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दि. ३९/८/२०२६

(शिक्का)

## वार्षिक सभेची नोटीस

**अक्कलकोट गटपातळीवरील औ. बहु. ग्रामीण सह. संस्था मर्या., अक्कलकोट, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर**

रजि.नं.एस.यु.आर./आर.एस.आर./१९२३/१९७२ — दि. ३१.०८.१९७२

जा.क्र. कारोहयो/वार्षिक सर्वसाधारण सभा/२४ — दि. ०१/०९/२०२६

### ५४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांकरिता)**

अक्कलकोट गटपातळीवरील औ. बहु, ग्रामीण सह. संस्था मर्या., अक्कलकोट, ता. अक्कलकोट या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा वार रविवार, दि. २०/०९/२०२६ रोजी सकाळी ठीक ११.३० वाजता संस्थेच्या कार्यालयात आयोजित केली असून सदर सभेमध्ये खालील विषयांबाबत कामकाज होईल.

**सभेपुढील विषय**

१. वार्षिक सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष निवडणे. २. मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडिंग वाचून कायम करणे. ३. सन २०२५-२०२६ ची आर्थिक पत्रके वाचून मंजूर करणे. ४. सन २०२६-२०२७ सालासाठी तयार केलेल्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे. ५. संस्थेचे थकबाकीबाबत विचार करणे. ६. सन २०२६-२०२७ च्या शासकीय लेखापरिक्षणासाठी लेखापरिक्षकांची नियुक्ती करणेबाबत. ७. दिनांक ३१/०३/२०२६ अखेर झालेल्या लेखापरिक्षण अहवालास मान्यता देणे. ८. संस्थेच्या कार्यक्षेत्राबाहेरील व अक्रियाशील सभासद कमी करणेस मान्यता देणे. ९. संस्थेस नांव देणे. १०. मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या आयत्या वेळच्या विषयांवर चर्चा करणे.

तरी मान्यवर सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांनी वेळेवर सभास्थानी उपस्थित राहावे.

**आपले नम्र**
**श्री.संजय घोडेके**
**अध्यक्ष**
**अक्कलकोट गटपातळीवरील औ. बहु. ग्रामीण सह. संस्था मर्या., अक्कलकोट, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर**

सूचना :- १. गणपूर्तीच्याअभावी सभा तहकूब झाल्यास ती सभा त्याच ठिकाणी त्याच विषयांवर त्याच दिवशी एक तासानंतर घेण्यात येईल व अशा सभेस गणपूर्तीची आवश्यकता लागणार नाही.

२. संस्थेच्या कामकाजाबाबत काही माहिती विचारावयाची असल्यास त्याचे आपण लेखी निवेदन अध्यक्ष यांच्याकडे दि. १८/०९/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत स. १०.०० ते ५.४५ पर्यंत आणून द्यावे. मुदतीनंतर आलेल्या निवेदनांचा विचार केला जाणार नाही.

**सही/- अध्यक्ष**
**अक्कलकोट गट पातळीवरील औद्यो. बहु, ग्रा. सह. संस्था मर्या., अक्कलकोट, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर**

# करमाळा होमगार्ड पथकात रक्षाबंधन उत्साहात साजरे



**करमाळा, (कटूसत्य वृत्त):-** करमाळा होमगार्ड पथकात बहिण-भावाच्या अतूट नात्याचे प्रतीक असलेला रक्षाबंधन सण उत्साहात साजरा करण्यात आला. होमगार्ड पथकाचे तालुका समादेशक अधिकारी सचिन जव्हेरी यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी सार्जंट महिला होमगार्ड जयश्री कांबळे, सेक्शन लीडर सारिका बिडकर, प्रभा दीक्षित, किशोरी शेंडगे, सरोजनी परदेशी, शैला बुटे, सुवर्णा गायकवाड आणि मनिषा कांबळे यांनी करमाळा होमगार्ड पथकातील सर्व पुरुष होमगार्डना बहिण-भावाच्या प्रेमाचे प्रतीक असलेली रेशमी धाग्याची राखी बांधली. यामुळे होमगार्ड सदस्यांमधील आपुलकीचे आणि बंधुत्वाचे नाते अधिक दृढ झाले. यावेळी होमगार्ड तालुका समादेशक अधिकारी सचिन जव्हेरी, पलटन नायक दीपक जव्हेरी, पलटन नायक महेश शहाणे, सार्जंट प्रविण महिंद्रकर, सेक्शन लीडर संदिप परदेशी, सोभनाथ ढेपे, पंकज अंदुरे, अ. सेक्शन लीडर दीपक घाडग, सद्दाम तांबोळी, होमगार्ड संभाजी कोळेकर, संतोष कुकडे, जावेद काझी, नारायण वायकुळे, संजय कोळेकर, आशोक कांबळे, गणेश साखरे, राहुल पवार, अतुल महाडिक, तुकाराम सोरटे, शकिल पठाण, गणेश शहाणे, ज्ञानेश्वर मचाले, अमोल गणगे, समाधान हानपुडे, विशाल नलवडे, तेजस महारनवर, बिभीषण टकले, नवनाथ मोरे, प्रदीप लाळगे आदी होमगार्ड तसेच सेवानिवृत्त सेक्शन लीडर होमगार्ड दादा शिंदे उपस्थित होते.

यावेळी उपस्थित होमगार्डना मार्गदर्शन करताना तालुका समादेशक अधिकारी सचिन जव्हेरी म्हणाले की, होमगार्ड संघटनेतील सदस्यांमध्ये जोश आणि उत्साह वाढावा, यासाठी पथकात वेळोवेळी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. आपले होमगार्ड पथक हा एक परिवार समजून आपण सर्वजण काम करत असल्याने, महिला व पुरुष होमगार्ड यांच्यातील बंधुत्व आणि आपुलकी वाढविणारा रक्षाबंधन हा सण आहे. या सणामुळे होमगार्ड संघटनेतील एकोपा, शिस्त तसेच संघटनेचे ध्येय-धोरण जपणे अधिक सोपे होणार आहे. महिला होमगार्ड भगिनींनी राखी बांधल्यामुळे आता आपल्या सर्वांची जबाबदारी वाढली आहे. त्यामुळे सर्वांनी होमगार्ड संघटनेची शिस्त, शिकवण, ध्येय-धोरणे, आदर्श तसेच आदेश व सूचनांचे आणि बंधुत्वाचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन जव्हेरी यांनी केले.

**महिला होमगार्ड भगिनींना साडी-चोळीची भेट**

करमाळा होमगार्ड पथकातील सर्व पुरुष होमगार्डनी स्वयंस्फूर्तीने महिला होमगार्डना भावाची भेट म्हणून मानाची साडी-चोळी भेट दिली. ही भेट स्वीकारताना महिला होमगार्ड भगिनी भावुक झाल्या. त्यांनी आनंदाने ही भेट स्वीकारून या अतूट नात्याबद्दल धन्यवाद व्यक्त केले. यानंतर सर्वांसाठी अल्पोपहाराचे आयोजन करून रक्षाबंधन सण उत्साहात साजरा करण्यात आला.


## Classified - छोटी जाहीरात

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर. **9420766666**

(सरकार मान्य)


### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**


सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**

मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहितातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) द्रोणाचार्यांचा पुतळा समोर ठेवून धनुर्विद्या शिकणारा धनुर्धर
२) भुजबळ या जिल्ह्यातून विधानसभेवर निवडून गेले आहेत
३) अंगावर शहारे आणणारे असे
४) भीती (हिंदीत)
५) नोकर ६) राज ठाकरे यांचा पक्ष
७) उशीर (हिंदीत)
८) कॉलनी (मराठीत)
१५) कामात मदत करणारा
१६) एक म्हण-*** तोंडी मोठा घास
१७) कपाळ १८) उष्ण
२०) पूर्वी पाणी आणण्यासाठी वापरली जायची ती चामड्याची मोठी गोण
२२) बोझा, भार
२६) खर्चात केलेली बचत २७) विधानसभेवर निवडून दिला जाणारा लोकप्रतिनिधी २९) पंधरा आणि सोळा मिळून होणारी संख्या
३१) शपथ (हिंदीत)
३२) होता जिवा म्हणून वाचला **
३३) माशाचा एक प्रकार
३५) जंगलात लागलेली आग
३८) महिना, माह
४०) बदामाप्रमाणे सुक्या मेव्यातील एक घटक

**आडवे शब्द :** १) भाजपमधून राष्ट्रवादी पक्षात आलेले राज्यातील एक ज्येष्ठ नेते
६) शिवशंकराचे एक नाव
९) रव्यापासून बनविलेला गरा १०) वर उलट लिहा
११) पृथ्वी, पाताळ कालवण १२) पटकन, त्वरेने
१३) केर *** १४) एक दाक्षिणात्य राजकारणात प्रवेश केलेला अभिनेता-*** हसन १७) शिजवलेला तांदूळ १८) दुर्ग, किल्ला
१९) पाच दुणे २०) रायगड जिल्ह्याचे मुख्यालय असलेले शहर
२१) बे दुणे २२) इनाम म्हणून मिळालेली जमीन २३) वखा उलट लिहा
२४) शंभर (हिंदीत) २५) जुन्या मराठी चित्रपटातील अभिनेता-रवींद्र ****
२६) हे कॅलेंडर प्रसिध्द आहे २८) सन उलट लिहा
३०) राशीचक्रातील एक रास ३२) दूध आणि केळीचे मिश्रण
३३) पाकिस्तान संक्षिप्तमध्ये असे लिहितात-** ३४) गुलाम
३५) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो ३६) सैन्याचा प्रमुख
३७) मग्न, लीन ३९) कागदाचा चर्तुथांश स्तंभ, कॉलम
४१) बुटाची दोरी ४२) प्रश्न (हिंदीत)
४३) या प्राण्याला वाळवंटातील जहाज म्हणतात

## सुडोकु - 43

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | 2 | 1 | | 7 | | | 6 |
| | 4 | | | | 6 | | | |
| 1 | 9 | | | | 4 | 7 | | 3 |
| | 7 | 8 | 4 | | | | 6 | 2 |
| | | 9 | 7 | | 3 | | 8 | 5 |
| | | | | 2 | | 3 | | 4 |
| | | 4 | 6 | | 2 | | | 1 |
| 2 | 5 | | 8 | | 1 | 6 | | |
| | 1 | 3 | | | 9 | | 2 | |

# विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना.... मागील 25 वर्षातील चौफेर प्रगतीची यशस्वी वाटचाल...

# विकासरत्न बबनराव शिंदे यांच्या कर्तृत्वातून साकारलेले एक यशस्वी शिल्प....

माढा तालुका पूर्वी रब्बी हंगामाचा दुष्काळी तालुका म्हणून ओळखला जात होता उजनी धरणाचे पाण्यामुळे 1990 पासून तालुक्याच्या पश्चिमेकडील 13 ते 14 गावांमध्ये बागायती क्षेत्र निर्माण झाले व शेतकरी ऊस पिकवू लागला परंतु हा ऊस गळितास पाठवण्यासाठी मात्र शेतकऱ्यांना जिल्ह्यातील ईतर किंवा जिल्ह्याबाहेरील साखर कारखान्यांवर अवलंबून राहावत लागत असे व यामध्ये शेतकरी हतबल होऊन जात होता.

1995 साली बबनराव विठ्ठलराव शिंदे माढा तालुक्याचे आमदार झाले आणि त्यांनी तालुक्यात साखर कारखाना उभारणीचे प्रयत्न सुरू केले. विशेष म्हणजे यामध्ये ते यशस्वी होऊन 21 मे 1999 रोजी पिंपळनेर गावच्या माळरानावर कारखाना उभारण्याची नोंदणी केली व भाग भांडवल जमा करण्यास सुरुवात केले,व बारा कोटी एक रकमी शासकीय भांडवल मिळवून प्रतिदिन 2500 मेट्रीक टन क्षमतेचा साखर कारखाना निर्मितीस प्रारंभ करून अवघ्या दहा महिन्यात उभारणी केली व 2001 च्या पहिल्या गाळप हंगामातच विक्रमी 4 लाख 58 हजार मेट्रिक टन उसाचे गाळप करून विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याच्या यशस्वी वाटचालीस प्रारंभ झाला.

### गाळप क्षमतेचा विस्तार प्रतिदिन 2500 ते 15000 मेट्रिक टन पर्यंत विस्तार भरारी..

कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार बबनराव शिंदे यांनी राज्य मंत्रिमंडळातील मंत्रीपद नाकारून माढा तालुक्याच्या विकासाचा ध्यास घेतला. उजनी धरणाचा भौगोलिक विचार करता धरण माढा तालुक्याच्या पश्चिम सीमेवर तयार झाले पण भीमा नदी काठावरील 13 ते 14 गावाशिवाय तालुक्यातील इतर सर्व क्षेत्रफळ उंचावर होते व तालुक्याच्या मध्यावरून वाहणारी लहान अशी सीना नदीत पावसाळ्यात फक्त तीन ते चार महिने पाणी दिसत असे व या सर्व परिस्थितीचा अभ्यास करून बबनदादांनी उजनी धरणावरून सीना- माढा सिंचन योजनेस शासकीय मंजुरी आणून काम सुरू केले व 2004 पासून ही योजना कार्यान्वित केली. त्याप्रमाणे 23 km लांबीचा भीमा सीना जोड कालवा- बोगदा मंजूर करून आणून तो कार्यान्वित करून उजनीचे पाणी सीना नदीत पोहोचवले व नदीत बंधारे बांधून पाणी अडवण्यात आले. पयार्याने सिना काठच्या लाभक्षेत्रात ऊस उत्पादनात वाढ होऊ लागली व ऊस उत्पादकांची गैरसोय होऊ नये म्हणून विठ्ठलराव शिंदे साखर कारखान्याच्या विस्तारीकरणावर भर देण्यास सुरुवात झाली. 2005 साली 2500 मेट्रिक टन गाळप क्षमतेचा कारखाना प्रतिदिन 3500 मेट्रिक टन क्षमतेपर्यंत वाढवला व 2009-2010 पर्यंत विस्तारित क्षमतेने गाळप केले. नंतरच्या पाच ते सहा वर्षाच्या काळात माढा तालुक्यात ऊस क्षेत्रात वाढ होऊ लागली व 26 ते 28 लाख मे.टन ऊस उपलब्ध होऊ लागला व म्हणून

2011- 2012 मध्ये प्रतिदिन 6000 मेट्रिक टना पर्यंत कारखान्याचे विस्तारीकरण करून 2013 पर्यंत या क्षमतेने गाळप केल्यात्यानंतर 2014 मध्ये 8500 मे.टन पर्यंत गाळप क्षमता वाढवली, तर 2017- 2018 मध्ये गाळप क्षमता 11 हजार मे.टन पर्यंत व नंतर 2025-2026 पासून प्रतिदिन 15 हजार मेट्रिक टन एवढ्या क्षमतेने यशस्वी गाळप करण्यात येत आहे.

### डिस्टिलरी प्रकल्प

विठ्ठलराव शिंदे कारखान्यामध्ये साखर निर्मिती बरोबर उपपदार्थ प्रकल्प उभारणीस प्रारंभ करण्यात आला व डिसेंबर २००३ मध्ये आर. एस, इ. एन. ए व इथेनॉल एकाच वेळी उत्पादित होणारा प्रतिदिन 30 हजार लिटर क्षमतेचा डिस्टिलरी प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला. या प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना चांगला ऊस दर देता येऊ लागला, यापुढे ऊस उपलब्धता, गाळप क्षमता, उत्पादित मोलेसिस, व अल्कोहोलची मागणी याचा विचार करून सन 2012 -2013 हंगामापासून 30000 लिटरचा अल्कोहोल प्रकल्प 60000 लिटर पर्यंत विस्तारित करण्यात आला त्यानंतर ऑइल कंपनीकडून इथेनॉलची मागणी वाढू लागली व त्याचा विचार करून केंद्र शासनाचे सब व्हेकेशन स्कीम अंतर्गत 60000 लिटर वरून प्रतिदिन 1 लाख 50 हजार लिटर क्षमतेचा आसवानी प्रकल्प उभारण्यात आला व उत्पादन सुरू झाले. केंद्र शासनाच्या 20 सप्टेंबर 20 च्या अधिनियम अंतर्गत या ठिकाणी नवीन 100 केएलपीडी आर एस (सी हेवी मोलॅसिस) व 150 के एल पी डी (बी हेवी मोलिसिस शुगर सिरप) व 200 के एल पी डी स्टॅन्ड अलोन इथेनॉल प्रकल्प उभारणी करून माहे नोव्हेंबर 22 अखेर डिस्टिलरी क्षमता प्रतिदिन 300 के एल पी डी पर्यंत विस्तारित करण्यात आली.

### सहवीज निर्मिती प्रकल्प उभारणी

उपपदार्थ निर्मिती करत असताना या साखर कारखान्यात 2007 साली प्रति दिन 7.5 मेगावॅट क्षमतेचा सहवीज निर्मिती प्रकल्प कार्यान्वित केला गेला. कारखान्यास वापरून राहिलेली वीज शासनाला विक्री करण्यास सुरुवात झाली. या प्रकल्पास शासनाचे प्रोत्साहन मिळत होते व कारखान्यात बऱ्याच अंशी उपलब्धता वाढत असल्यामुळे 2011 -2012 हंगामापासून 28 मेगावॅट क्षमतेचा प्रकल्प कार्यान्वित केला तर 2014- 2015 पासून प्रतिदिन 38 मेगावॅट पर्यंत विस्तार करून यशस्वीरित्या वीज निर्मिती होऊ लागली.

### रिफायनरी शुगर प्रकल्प

पाश्चिमात्य देशात गंधक विरहित साखरेची मागणी जास्त असल्याने कारखान्याने 2009 मध्ये प्रतिदिन 2500 क्विंटल निर्मिती क्षमतेचा देशातील सहकारी तत्त्वावरील पहिला रिफायनरी शुगर प्रकल्प कार्यानित केला आहे.

बंद पाणीपुरवठा संस्था कार्यान्वित... कारखाना कार्यक्षेत्रात बंद अवस्थेत असलेल्या श्री गणेश व हरितक्रांती पाणीपुरवठा संस्था करार करून चालवण्यास घेऊन कार्यक्षेत्र वाढवले आहे ,त्यामुळे बैलगाडी श्रेणी ऊस तोडणी क्षेत्रात भरीव वाढ झाली आहे.

### ऊस विकास योजना

कारखान्यास चांगला परिपक्व, उच्च साखर उताऱ्याचा ऊस पुरवठा व्हावा यासाठी पायाभूत बेणे पुरवणे, बेणे बदल योजना, शेतकऱ्यांना रासायनिक खत पुरवठा, दहा हजार हेक्टर( 25 हजार एकर) क्षेत्रावर ठिबक संच बसवून देणे, माती व पाणी परीक्षण प्रयोगशाळा इत्यादी सुविधा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिल्याने कार्यक्षेत्रात ऊस उत्पादन वाढीस मोठी चालना मिळालीआहे. कार्यक्षेत्रात ऊस उत्पादन प्रति एकरी 100 मेट्रिक टन किंवा त्यापेक्षा जास्त व्हावे यासाठी होतकरू शेतकरी निवडून त्यांना बांधावर जाऊन मार्गदर्शन करणे व हंगाम निहाय आदर्श ऊस प्लॉट्स निर्माण व्हावेत म्हणून वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट पुणे येथील तज्ञ मान्यवरांचे मार्गदर्शन घेण्यात येत आहे, तसेच ऊस उत्पादन वाढीसाठी राज्य पातळीवरून वसंत दादा शुगर इन्स्टिट्यूट मध्ये आयोजित 'ज्ञान याग' शिबिरासाठी शेतकऱ्यांना प्रत्येक वर्षी पाठवण्यात येते.

### विठ्ठलराव शिंदे युनिट दोन करकंब तालुका पंढरपूर कार्यान्वित

सरफेसी ॲक्ट अंतर्गत करकंब तालुका पंढरपूर येथील शिवरत्न उद्योग समूहाचा विजय शुगर हा प्रतिदिन 2500 मॅट्रिक टन गाळप क्षमता व 12.5 मेगावेट सहवीज निर्मिती प्रकल्प असलेला कारखाना, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून सरफेसी ॲक्ट अंडरटेंडर प्रक्रियेद्वारे 125 कोटी रुपयांना लिलावात विक्रीस निघालेला विकत घेऊन 2019 -2020 मध्ये विठ्ठलराव शिंदे युनिट दोन म्हणून गाळपास सुरुवात केली व तेव्हापासून 2025- 2026 पर्यंतचे सर्व हंगाम यशस्वीरित्या पार पडले आहेत.

सन 2021 -2022 गळीत हंगामात युनिट एक पिंपळनेर येथे एकूण 24 लाख 78 हजार मेट्रिक टन ऊस गाळप व युनिट दोन करकंब येथे 6 लाख 55 हजार मॅट्रिक टन असे एकूण 31 लाख 33 हजार मेट्रिक टन ऊस गाळप करून विठ्ठलराव शिंदे कारखान्याची विक्रमी गाळप केले म्हणून देशपातळीवर नोंद झाली .

### देश व राज्य पातळीवरील पुरस्कार

विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्यास विक्रमी ऊस गाळप, तांत्रिक कार्यक्षमता, सर्वोत्कृष्ट असवानी प्रकल्प, उत्तम आर्थिक व्यवस्थापन, सर्वोत्कृष्ट उद्योजकता पुरस्कार, सर्वोत्कृष्ट ऊस विकास पुरस्कार, सर्वोत्कृष्ट साखर कारखाना पुरस्कार, उल्लेखनीय साखर निर्यात इत्यादी उल्लेखनीय कार्यांचे राज्य व देश पातळीवरील



एकूण 28 पुरस्कार मिळाले आहेत.

### ऊस दर

ऊस दर देण्याचे स्पर्धेत विठ्ठलराव शिंदे कारखान्याने जिल्ह्यातील इतर सहकारी साखर कारखान्याचे बरोबरीने ऊस दर देण्याची परंपरा कायम राखली असून गळीतास येणाऱ्या उसाचे दर दहा दिवसाला ऊस उत्पादकांचे बिल त्यांच्या बँक खात्यावर अदा केले जाते व असे दहा दिवसाला बिल देणारा महाराष्ट्रातील हा एकमेव कारखाना आहे .

### कर्मचारी वर्ग

कारखान्याचे कर्मचाऱ्यांना वेज बोर्ड नुसार पगार दिला जातो, यापूर्वी करारानुसार 18% वेतन वाढीचा एकरकमी फरक दिला असून पुढे पंधरा टक्के वेतन वाढ लागू करण्यात आली व याचा फरक देखील देण्यात आला, तर 12% वेतन वाढ देखील लागू करण्यात आली आहे.तसेच त्यानंतर 10 % वेतन वाढ देखील लागू करण्यात आली आहे.

### आर्थिक स्थिती भक्कम

कारखान्याची आर्थिक परिस्थिती अतिशय चांगली असून 31 मार्च 26 अखेर कारखान्याचे नेटवर्क प्लस 206.26 कोटी रुपये आहे.

### सामाजिक बांधिलकी जनावरासाठी चारा छावण्या

सन 2003-04 व सन 04-05 मध्ये दुष्काळी परिस्थिती होती व या परिसरातील शेतकऱ्यांच्या जनावरांचे अतिशय हाल होऊ लागले . ही जनावरे सांभाळण्यासाठी विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून एकूण 10 ठिकाणी छावण्या सुरू केल्या व लहान-मोठी 35000 जनावरे जगवली, तसेच सन2012 -2013 चे दुष्काळी परिस्थितीत 49 छावण्या उघडून 65000 जनावरांचे संगोपन केले तर 2019 मध्ये विठ्ठलराव शिंदे कामगार पतसंस्थेमार्फत एकूण 40 ठिकाणी जनावराच्या छावण्या सुरू करून त्यामध्ये 30000 जनावरांचे संगोपन केले.

### मोफत सामुदायिक विवाह सोहळा

आर्थिक टंचाईमुळे गोरगरिबांच्या मुला मुलींचे विवाह वेळेवर होत नाहीत आणि शेतकरी शेतमजूर यांना ऐपत नसताना कर्ज काढून खर्च करावा लागतो तो कर्जबाजारी होतो म्हणून ही अडचण लक्षात घेऊन संस्थापक अध्यक्ष माजी आमदार बबनदादा शिंदे यांनी विठ्ठलराव शिंदे सांस्कृतिक मंडळाचे माध्यमातून 2004 पासून मोफत सर्व धर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन केले. आज अखेर 1800 जोडप्यांनी या विवाह सोहळ्याचा लाभ घेतला असून सामुदायिक विवाह सोहळ्यामध्ये विवाह पात्र जोडप्यांना शासनाच्या महिला व बालकल्याण तसेच समाज कल्याण विभागाकडून वीस हजार रुपयांचे अनुदान मिळवून दिले.

### मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

वयोवृद्ध शेतकऱ्यांना व शेतमजुरांना डोळ्यासाठी महागडी औषधे किंवा ऑपरेशन्स परवडत नाहीत. सन 2006 पासून प्रख्यात नेत्रतज्ञ पद्मश्री तात्याराव लहाने व डॉक्टर रागिणी पारेख यांच्या अधिपत्याखाली विठ्ठलराव शिंदे कारखाना व माढेश्वरी बँकेच्या सहयोगातून मोफत नेत्र शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करून आत्तापर्यंत पंधरा हजार डोळ्याच्या रुग्णांची तपासणी केली आहे तर 8000 पेक्षा जास्त रुग्णावर मोफत नेत्र शस्त्रक्रिया केल्या आहेत आणि त्यांच्या जीवनात नवीन प्रकाश निर्माण केला आहे.

### मोफत तीर्थयात्रा

या कारखान्या मार्फत गरीब व वयोवृद्ध शेतकऱ्यांना व शेतमजुरांना काशी यात्रा, बुद्धगया,बालाजी, ओम शांती माउंट आबू यात्रा यांचा लाभ मिळवून दिला आहे. कारखान्यामार्फत मोफत काशी यात्रा करणारे 15000 पेक्षा जास्त जेष्ठ नागरिक असून सर्वांचे आशीर्वाद बबन दादांना मिळत आहेत. सन 2024 मध्ये तुळजाभवानी भक्तांसाठी मोफत तुळजापूर यात्रेचे आयोजन करून 12 हजार भक्तांना मोफत तुळजापूर यात्रा घडविली. बुध्दगया यात्रेच्या माध्यमातून 2 हजार व माऊंट आबू यात्रेच्या माध्यमातून 3 हजार 500 नागरिकांना मोफत यात्रा घडविली.

### पूरग्रस्तांना मदत

पश्चिम महाराष्ट्रातील सांगली व कोल्हापुर जिल्ह्यात कृष्णा व पंचगंगा नद्याना सन 2019 मध्ये महापुर आलेला होता. यामुळे शहरे व अनेक गावातुन महापुराचे पाण्याने थेमान घातलेले होते यामुळे हजारो नागरिंकांचे जनजिवन विस्कळीत होवुन संपुर्ण संसार पाण्यात बुडालेला होता. अशा 10 हजार पुरग्रस्ताना विठ्ठलराव शिंदे कारखान्याचे माध्यमातून त्यांचे जागेवरच (कॅम्प ठिकाणी) जेवण तयार करुन देणेची व्यवस्था करणेत आलेली होती.तसेच 50 हजार बिस्लरी पाण्याच्या बाटल्याही पुरविण्यात आल्या. पुरग्रस्तांसाठी कामगारांचा एक दिवसाचा पगार रू.5 लाख मुख्यमंत्री निधीस अदा करणेत आला.

### जलसंधारण कामे

सन 2013 ते 2015 व 2016 मध्ये कारखान्याच्या माध्यमातून ओढ्यांचे रुंदीकरण व खोलीकरण करण्याबरोबरच बंधाऱ्यातील गाळ काढण्याचे काम मोठ्या प्रमाणात हाती घेतले होते तसेच माढा पंढरपूर व माळशिरस तालुक्यातील गाळ काढण्याकरता लागणाऱ्या वाहनांना शिंदे कारखान्या मार्फत एकूण दहा हजार लिटर डिझेलचा पुरवठा करण्यात आला होता.

पाणी फाउंडेशनच्या वॉटर कॉम्पस मध्ये सहभागी झालेल्या गावांना या अंतर्गत कार्यक्षेत्रात जलसंधारण कामासाठी मदत म्हणून वाहनांच्या डिझेल खचार्साठी पैसे देण्यात येत होते.

### पूरग्रस्तांना मदत

पुणे सातारा जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे उजनी व वीर धरणातून सोडलेल्या पाण्याने भीमा नदीला पूरस्थिती निर्माण झाली होती., कारखान्याचे माध्यमातून जिल्ह्यातील दहा हजार पूरग्रस्तांसाठी जागेवरच कॅम्प ठिकाणी जेवणा ची व्यवस्था त्याचबरोबर पाण्याच्या बॉटल्स व निवारा देण्याचे कार्य करण्यात आले होते, .नुकतेच मागील वर्षी सीना नदीला आलेल्या महापुरामध्ये माढा तालुक्यातील अनेक गावे पाण्याखाली गेली परंतु तेथील पूरग्रस्तांना जेवण नाश्ता चहा निवास व निवारा इत्यादी सोयीसुविधा कारखान्यामार्फत पुरवण्यात आल्या.

### वृत्तविशेष

विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष बबनराव शिंदे यांनी कठोर परिश्रमातून साखर कारखान्यासारखे शेतकऱ्यांचे यशोमंदिर उभारून त्याची यशस्वी वाटचाल चालू ठेवली आहे. त्यांचे सुपुत्र जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजीत सिंह बबनराव शिंदे हे मागील अनेक वषार्पासून आपल्या वडिलांच्या राजकीय व सामाजिक कार्यामध्ये सहभागी होऊन भरीव कार्य करत आहेत तसेच दादांचे धाकटे सुपुत्र विक्रम सिंह शिंदे हे देखील सामाजिक व राजकीय कार्यामध्ये नेहमी सहभागी होत आहेत.



विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याच्या जडणघडणीमध्ये व नेत्र दीपक प्रगतीमध्ये या कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार बबनदादा शिंदे यांचे अचूक नियोजन, योग्य मार्गदर्शन, निर्णय क्षमता व कार्यक्षमता जेवढी मोलाची आहे तेवढेच धडाडीचे योगदान, सहकार्य व तेवढीच प्रभावी विचारसरणी व निर्णय क्षमता बबन दादांचे सुपुत्र रणजीतसिंह बबनराव शिंदे उर्फ भैय्यासाहेब शिंदे यांची पण दिसून येते.

आदरणीय बबनदादांच्या बरोबरीने मागील दहा वषार्पासून रणजीतभैयांनी राजकीय, सामाजिक व साखर कारखानदारीक्षेत्रात सखोलज्ञान ,व्यवहार चातुर्य आणि अनुभव संपादन केला आहे, याची प्रचिती मागील संपूर्ण वर्षात हजारो, लाखो जनसामान्यांनी प्रत्यक्ष अनुभवली आहे. सध्या रणजीत भैयांनी आपल्या कुशल नेतृत्वाखाली व वरिष्ठ राजकीय नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली माढा मतदारसंघातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत घवघवीत यश संपादन केले असून विठ्ठलराव शिंदे साखर कारखान्याची पाचवी पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध यशस्वी करून दाखवली आहे. संयमी, शांत अचूक व योग्य निर्णय क्षमता व तसेच सकारात्मक विचारसरणीचे युवक नेते रणजीतभैया शिंदे हे भविष्यात सामाजिक व राजकीय क्षितिजावर नेत्रदीपक यश संपादन करतील यात तिळमात्र शंका नाही. गरीब, शेतकरी आणि गरजू कुटुंबांना मदत केल्यामुळे जे समाधान मिळतं, ते शब्दांत सांगता येत नाही. त्यांच्या पाठीशी असणारे आशीर्वाद माणसाला आयुष्यात नेहमीच संकटांतून मार्ग काढायला मदत करतात आणि पुढे जाण्याची ताकद देतात,निःस्वार्थ भावनेने केलेली मदत



कधीच वाया जात नाही, ती कोणत्या ना कोणत्या रूपाने आपल्याकडे परत येते याचीच पोच पावती म्हणून मा.आ.बबनदादा शिंदे हे बरे होवून सुखरूप पुन्हा एकदा आपल्या सेवेत हजर झाले आहेत. आदरणीय दादांना निरोगी दीर्घायुष्य लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

**- श्री.संतोष नाभिराज डिग्रजे,**
कार्यकारी संचालक, विठ्ठलराव शिंदे स.सा.का.लि.

